**शिक्षण संचालनालय**

(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

महाराष्ट्र राज्य

---

क्र.: संकीर्ण-२०१२/विपश्यना/१५क्र.(०८)    दि १५/१०/२०१२.

प्रति,

[illegible] ..............................

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक)जिल्हा परिषद,

विषय: मित्र उपक्रमांतर्गत विपश्यना प्रशिक्षणास उपस्थित राहण्याबाबत.

संदर्भ: 1) क्र.संकीर्ण 2011/296/11/माशि-3 दि.5 ऑक्टोबर 2011.
2) क्र.संकिर्ण 2011 (296/11)माशि-3 दि.27 जानेवारी 2011.

राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विपश्यना तसेच आनापान प्रशिक्षण कार्यान्वित करण्याचे वरील संदर्भाधिन आदेशान्वये तपशिलवार सूचना निर्गमित केल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व मानसिक विकासाकरिता उपयुक्त ठरणारा हा उपक्रम असून ध्यान, साधनाद्वारे विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावणारा, एकाग्रतेने वाचन, लेखन व श्रवण करण्याचे कौशल्य विकसित करणारा, प्रगतीला मारक ठरणारे विकार काढून टाकणारा व कसलाही प्रसंग निर्माण झाल्यास अविचलित राहणारे मन घडविण्यासाठी या प्रशिक्षणातून प्रयत्न केला जाणार आहे.

आपल्या जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक / शिक्षक यांना सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याचे आदेश आपल्या स्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत. प्राथमिक शाळांतील 1000 किंवा त्यापेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या मुख्याध्यापकांचा प्राधान्याने या उपक्रमात समावेश करण्यात यावा. तद् नंतर 750 किंवा त्यापेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या मुख्याध्यापकांचा समावेश करण्यात यावा. सदर मुख्याध्यापक/ शिक्षकांचे वय 55 वर्षापेक्षा जास्त नसावे याची दक्षता घ्यावी.

या उपक्रमांतर्गत सन 2012 च्या उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये प्रत्येक जिल्हयातील 100 शिक्षकांनी सहभाग घ्यावा असे ठरले. यानुसार प्रत्येक जिल्हयाने सहभाग घेऊन जवळपास 3000 शिक्षकांनी या उपक्रमांतर्गत विपश्यना शिबीर पूर्ण केले व शाळेतील विद्यार्थ्यांना आनापानचे प्रशिक्षण व सराव करुन घेत आहेत. या उपक्रमाचा लाभ राज्यातील प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला व्हावा या दृष्टीने विपश्यना केंद्रांवर प्रत्येक जिल्हयातून महिन्याला एक यानुसार 20 शिक्षकांनी सहभागी व्हावयाचे आहे. या बाबतचा कार्यक्रम विपश्यना रिसर्च इन्स्टीटयूट यांच्यामार्फत तयार करण्यात आलेला आहे व त्याची प्रत साबत जोडत आहे. यानुसार आपल्या जिल्हयातील शिक्षकांना

नेमून दिलेल्या तारखेस संबंधित विपश्यना केंद्रावर पाठवावे. याबाबत खालील मुद्दे विशेषकरुन प्रशिक्षणार्थिंच्या निदर्शनास आणावे.

1) संपूर्ण प्रशिक्षणाचा कालावधी 12 दिवसांचा आहे, यात पहिल्या दिवशी दुपारी 2.00 पर्यंत शिबीरास पोहचणे आवश्यक आहे. यानंतर विपश्यना शिबीर सुरु होईल व हे 12 व्या दिवशी सकाळी 5.00 वाजता संपेल. तदनंतर 12 व्याच दिवशी सकाळी 8.00ते सांयकाळी 5.00 पर्यंत मित्र उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आनापन शिबिराबद्दल कार्यशाळा घेतली जाईल. यानुसार संपूर्ण प्रशिक्षणाचा कालावधी पहिल्या दिवसाच्या दुपारी 2.00 वाजल्यापासून 12 व्या दिवशी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत आहे.

2) शिबीर केंद्रावर निवास, भोजन, ध्यान साधना इत्यादी बाबतची परिपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे. तथापि, स्वत:चे मैल कपडे, मुखमार्जन साहित्य, साबून आदि अत्यावश्यक साहित्य प्रशिक्षणार्थींनी सोबत आणावयाचे आहे. निवास स्थळी मोबाईल, पेन, कागद, पुस्तके अथवा ध्यान साधनेपासून चित्त विचलित करणारे कोणतेही साहित्य प्रशिक्षणार्थीला सोबत बाळगता येणार नाही. तसेच हे साहित्य प्रशिक्षण स्थळी शिबीर कालावधीत सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे.

3) शिबीर सुरु होणा-या तारखेच्या दिवशी दुपारी 2.00 पर्यंत शिबीर स्थळी प्रशिक्षणार्थ्यींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

4) विपश्यना शिबीर केंद्राची http://www.vridhamma.org/Code-of-Discipline वरील आचार संहिता काळजीपूर्वक अभ्यासून त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थीनी आपले आचरण ठेवणे बंधनकारक आहे. याबाबतची विस्तृत माहिती वेबसाईट www.vridhamma.org वर उपलब्ध आहे.

5) आचार संहितेमध्ये प्रामुख्याने शिबीर तारखेच्या पूर्व संध्येपासून (रात्री 8.00 पासून) अंतीम दिवसापर्यंत मौन पाळणे आवश्यक आहे. याशिवाय प्रशिक्षण स्थळीचे आचार्य देतील त्या सूचनांचे पालन प्रशिक्षणार्थ्यांना करावे लागते व सकाळी 4.30 ते रात्री 9.30पर्यंत चालणा-या ध्यान साधनेच्या (पूर्वतयारी, जेवण व विश्रांतीसाठीचा कालावधी सहित) सर्वच कार्यक्रमात शिस्तीचे व शांततेचे पालन करुन सहभागी व्हावे लागेल.

6)तसेच शिक्षकांची यादी खालील माहितीसह देण्यात यावी.

1) पूर्ण नाव व पद -
2) वय-
3) लिंग- पुरुष / स्त्री
4) शाळेचे नाव व पत्ता -
5) घरचा पत्ता-
6) भ्रमणध्वनी क्र. -
7) लॅन्डलाईन क्र.
8) ई-मेल आयडी क्र-

वरीलप्रमाणे माहिती ह्या कार्यालयास तसेच संबंधित विपश्यना केंद्रावर संबंधित शिबिराच्या किमान 15 दिवस अगोदर द्यावी.

तूर्तास, सोबतच्या जोडपत्रानुसार मार्च 2013 पर्यंतचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आलेला आहे.

हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आपल्या स्तरावर संबंधित विपश्यना केंद्राशी लवकरात लवकर संपर्क साधून हा कार्यक्रम पुढेही सातत्याने सुरु ठेवावा व आपल्या जिल्ह्यातील सर्व 5वी ते 10वीचे वर्ग असलेल्या शाळांमधून किमान एक शिक्षक हे प्रशिक्षण घेईल असे पहावे.

डॉ.श्रीधर साळुंखे<br>(शिक्षण संचालक)<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक, प्राथमिक)<br>महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत माहितीसाठी -**

1. संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
1. श्री.र.प्र.आटे, उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32
2. श्री. संतोष आगळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32
3. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

**प्रत माहितीसाठी -**

मा.डॉ.पी.एस.मीना, उपमुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई 32

(C:2/My Doc/MDR/2012/Sanchal anal aya Pune)